जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २२९ दिनांक - ३०/०४/२०२४**

बंडगार्डन पोलिस स्टेशन पुणे शहर

## ६ महिने वयाच्या बालकाचे अपहरण करून विक्री करणारे टोळीला विजापुर राज्य कर्नाटक येथुन जेरंबद व अपहरण झालेल्या बालकाची सुटका....

दिनांक २७/०४/२०२४ रोजी पुणे रेल्वे स्टेशन,समोरिल मोकळया जागेत आई सोबत झोपलेल्या ६ महिने वयाचे बालकाला पाहटे ०२.०० वाजताचे सुमारास अनोळखी इसमाने उचलुन अपहरण करून चोरी केल्याचे मुलाचे नातेवाईक वडील यांनी ०४/०० वाजताचे सुमारास फिर्यादी वय ३४ वर्षे रा.यवतमाळ यांनी समक्ष पोलीस ठाणेस येवून कळविल्याने **बंडगार्डन पोलीस ठाणे गु.र.नं.११८/२०२४ भादंवि कलम ३६३,३७०,३४ प्रमाणे गुन्हा नोदं करणेत आला.**

**सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून त्वरील ३ टीम तयार करून परिसरातील ५० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासले असता एका ठिकाणी संशयीत इसम मुलास उचलुन घेवून जाताना अस्पष्टपणे दिसुन आले. त्यानंतर पुन्हा बारकाईने पाहिले असता सदरचा संशयीत इसम हा पुणे स्टेशन परिसरातुन कोणत्या मार्गाने गेला हे दिसुन आले नाही त्यामुळे सदर गुन्हयामध्ये चारचाकी वाहनाचा वापर झाला असावा तसेच गुन्हयात आरोपी १ पेक्षा जास्त असल्याचा संशय बळविल्याने सदरबाबत तांत्रिक विश्लेषण करून गुन्हयातील आरोपी हे चारचाकी गाडीने पुणे स्टेशन येथुन विजापुर राज्य कर्नाटक येथे गेल्याचे निष्पन्न झाले.**

त्यानंतर सदर गुन्हयाचे अनुषंगाने बंडगार्डन पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि रविंद्र गावडे व टीम वीजापुर राज्य कर्नाटक येथे तत्काळ रवाना करून सदर ठिकाणी वेगवेगळया ठिकाणी छापा टाकुन इसम नामे चंद्रशेखर मलकाप्पा नडुगंड्डी वय २४ वर्षे रा.जंबगी ता.जि.वीजापुर यास त्याचे राहते घरातुन ताब्यात घेतले त्याचेकडे कौशल्या पुर्ण तपास केला असता त्याने सदरचे बालक हे त्याचे इतर ४ साथीदार यांचे मदतीने अपहरण करून त्यांचेडील इंडिका कार मधुन वीजापुर येथे नेवून इसम नामे सुभाष सताप्पा कांबळे वय ५५ वर्षे रा.लांवगी सोलापुर यांना ३ लाख रुपयांना विक्री केल्याचे सांगितल्याने सदरील पोलीस पथकाने विजापुर शहर येथे वेगवेगळया हॉटेलमध्ये पाहणी केली असता हॉटेल राजधानी,गांधी चौक वीजापुर येथे अपहरण झालेले बालक व आरोपी सुभाष कांबळे यांना ताब्यात घेतले आहे.

**सदरचे उत्कृष्ट कामगिरीबाबत मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.अमितेश कुमार यांनी रोख एक लाख रुपये बक्षिस देवुन टिमचा गौरव केला आहे.**

सदरची कारवाई ही मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे, श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,पुणे शहर श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा पोलीस आयुक्त लष्कर विभाग,श्री.संजय सुर्वे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीकांत निबांळकर यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ंसदिप मधाले, पोलीस उप-निरीक्षक रविंद्र गावडे, पोउपनि चेतन धनवडे, पोलीस अंमलदार सुधीर घोटकुले, ज्ञानेश्वर बडे, सागर घोरपडे, मंगेश बोराडे, शिवाजी सरक, मनोज भोकरे, ज्ञानेश्वर गायकवाड, राजु धुलगुडे, विलास केकान यांचे पथकाने केली.



